Impact Factor – 3.452 ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

# RESEARCH JOURNEY

Multidisciplinary International E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL


February-2018

SPECIAL ISSUE-XXXVII

# Indian Literature and Society

## भारतीय साहित्य और समाज

## भारतीय साहित्य आणि समाज



Guest Editor :
**Dr. D. E. Shirude**
**Principal**
**M.G.V.'s S.P.H. Arts, Science & Commerce College, Nampur, Tal. Baglan, Dist.-Nashik**

Executive Editor :
Prof. C. B. Patil (English)
Prof. R. P. Thakare (Hindi)
Prof. Sunil Jadhav (Marathi)

Chief Editor
Dr. Dhanraj Dhangar

This Journal is indexed in :
[illegible]

Swatidhan Publications

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) – 3.009, (GIF) –0.676 (2013)
Special Issue 47 : Indian Literature & Society
UGC Approved No. 40705 & 44117

ISSN : 2348-7143
February 2018


| | | | |
|---|---|---|---|
| 51 | 'अन्या से अनन्या' में स्त्री-विमर्श | प्रा.अनिता कुंभार्डे, डॉ.अनिता नेरे | 201 |
| 52 | हिंदी के आँचिल उपन्यासों में अभिव्यक्त नारी चेतना | प्रा. योगिता उशिर | 205 |
| 53 | आज के जन जीवन में साहित्य ओर पत्रकारिता का महत्व | प्रा.सौ.सुरेखा भामरे | 209 |
| 54 | माचवी बोली के लोकसाहित्य, लोक जीवन की सांस्कृतीक पृष्ठभूमि | डॉ.शोभा ढाणकीकर | 215 |
| 55 | बीसवी शताब्दी के अंतिम दशक कि लेखिकाओं कि कहानियों में सामाजिक चेतना | प्रा. ममता पंजाबी | 218 |
| 56 | हिंदी पत्रकारिता और साहित्यः स्वरुप एवं विवेचन | डॉ.नवनाथ गाड़ेकर | 222 |
| 57 | 'अग्निगर्भ' में भारतीय सामाजिक चित्र | डॉ.चेतनकुमार मोदी | 225 |
| 58 | जनसंचार माध्यमों में हिंदी का महत्व | डॉ.परमेश्वर काकडे | 229 |
| 59 | भारतीय साहित्य की अवधारणाः एक विचार | डॉ.जितेंद्रकुमार चौधरी | 232 |
| 60 | निर्मला पुतुलःअभिव्यक्ति का यथार्थ | प्रा.कृष्णदेव तिवारी | 236 |
| 61 | 'रश्मिरथी' में कर्ण चरित्रांकन | डॉ.पूनम बोरसे | 241 |
| 62 | कोरकू जनजाति की भाषा, संस्कृति और समाज का अध्ययन | प्रा.पन्नालाल धुर्वे | 245 |
| 63 | 'विष्णुविराट के नवगीतों में ग्राम विमर्श' | प्रा.व्ही.जी.राठोड | 249 |
| 64 | 'गोदान' के नारी-पात्रों में भारतीयता | डॉ.रुक्मणी पटेल | 253 |
| 65 | समकालीन हिंदी कहानी साहित्य में महानगर विमर्श (कमलेश्वर के कहानियों के संदर्भ में ) | डॉ. संजय दवंगे | 258 |
| 66 | भारतीय साहित्य कि अवधारणा | डॉ. मनिष पटेल | 261 |
| 67 | भारतीय साहित्य और समाज | डॉ. मुकेश वसावा | 264 |
| | **मराठी विभाग** | | |
| 68 | साहित्यातील जात, लिंग, वर्ग, वर्णाच्या भेदभावाचे प्रतिबिंब | डॉ.नवनाथ गोरे | 268 |
| 69 | महाराष्ट्रीयन समाज आणि मराठी साहित्य | डॉ.राहुल पाटील | 271 |
| 70 | दलित साहित्यातील सामाजिकता | प्रा.ए.जी.नेरकर | 278 |
| 71 | साहित्याची सामाजिकता | डॉ.स्नेहल मराठे | 281 |
| 72 | भाषा, समाज आणि संस्कृति | प्रा.गणेश अहिरे | 284 |
| 73 | समन्वयशील दत्त संप्रदायाचे वाङ्मयीन योगदान | डॉ.रविंद्र बेम्बरे | 287 |
| 74 | लोकहितवादींच्या निबंधातील सामाजिकता | प्रा.योगेश शेळके | 291 |
| 75 | समकालीन फॅशन आणि उपयोजित मराठी साहित्य | प्रा.गजानन भामरे | 294 |
| 76 | भारतीय कविता आणि सामाजिक स्थित्यंतरे | प्रा. विद्या सुर्वे -बोरसे | 297 |
| 77 | भारतीस साहित्यातील दलित साहित्याचे स्वरुप | प्रा.एस.जी.कन्नोर | 301 |


*Our Editors have reviewed paper with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responsible for originality of the papers and intensive thoughts in the papers.*

**- Executive Editor**

**Published by -**

© Mrs. Swati Dhanraj Sonawane, Director, Swatidhan International Publication, Nashik
Email : swatidhanrajs@gmail.com Website : www.researchjourney.net Mobile : 9665398258

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) – 3.009, (GIF) –0.676 (2013)
Special Issue 47 : Indian Literature & Society
UGC Approved No. 40705 & 44117
ISSN : 2348-7143
February 2018

# समकालीन फॅशन आणि उपयोजित मराठी साहित्य

**प्रा. गजानन भामरे**
महाराजा सयाजीराव गायकवाड महाविद्यालय,
मालेगांव.

मानवी जीवन हे काळानुरुप बदलत असते. या बदलत्या काळाचा मानवाच्या जीवनशैलीवर परिणाम अपरिहार्य असतो. काळानुसारच मानवाच्या सभोवतालचे अनेक प्रकारचे परिवर्तन होत असते. आजचा विचार केल्यास मानवाच्या या सभोवतालामध्ये अनेक प्रकारचे बदल झालेले आहेत. निसर्ग, विज्ञान, तंत्रज्ञान, समाज, कुटूंब, प्रशासन, राजकारण, वाणिज्य-व्यापार, शिक्षण, संस्कृती, धर्म, कला, क्रिडा, तत्त्वज्ञान, कृषी, अध्यात्म व माध्यमे, फॅशन या सर्वांमध्येच मोठया प्रमाणावर बदल घडून आलेले दिसतात. या संपूर्ण मानवी जीवन व्यवहाराला आज जागतिकीकरणामुळे (Globalization) वेगळे आयाम प्राप्त झाले आहेत. शिक्षणाच्या सार्वत्रिकरणामुळे आज शिक्षणाची सुविधा खेडो-पाडी, वाडीवस्त्यांवर पोहोचली आहे. नवनवीन प्रसारमाध्यमे निर्माण झाली. दळणवळणांच्या साधनांची रेलचेल झाली. अनेकांच्या घरी अत्याधुनिक तंत्रज्ञानायुक्त टी.व्ही. मोबाईल आहेत. इंटरनेट स्मार्टफोन यांनी तर मानवी जीवनशैलीमध्ये मोठया प्रमाणावर परिवर्तन घडवून आणले आहे.

साहित्य हे समाजाचा आरसा आहे असे म्हटले जाते आणि ते खरेही आहे. संस्कृती आणि साहित्य, संस्कृती आणि भाषा यांचा परस्पर संबंध पुरातन काळापासुनच चालत आलेला आहे. रामायण, महाभारत यासारख्या महाकाव्यामध्ये देखील आपल्याला तत्कालीन सामाजिक, सांस्कृतिक, भाषिक, धार्मिक, राजकीय अशा विविध बाबतीत संदर्भ आलेले दिसतात. जीवनाचा अर्थच 'गतिशीलता' मानला गेला आहे. निसर्गालाही 'गतिशीलता' प्राप्त झाली आहे. निसर्ग चक्रानुसार सृष्टीत अनेक प्रकारचे बदल घडून येतात. मानवी जीवनही त्याला अपवाद नाही. निसर्ग चक्राप्रमाणे मानव जीवनात घडणारे परिवर्तन हे अपरिहार्य असते. तर विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या प्रगतीनुसार घडणारे बदल ही मानवाची गरज बनते. या गरजेतूनच माणूस मोठया प्रमाणावर बदलत्या अत्याधुनिक साधनांचा वापर करत असतो.

विज्ञान व तंत्रज्ञानाच्या शोधातून अत्याधुनिक साधनांची उपलब्धता आणि समाजाकडून त्यांचा होणारा वाढता वापर यामुळे या साधनांच्या वापरासंबंधी व अनुसरणासंबंधी व्यवहारोपयोगी असे उपयोजित साहित्य मोठया प्रमाणावर उपलब्ध झाले आहे. आणि अशा उपयोजित साहित्याचा वापर सामाजामध्ये मोठया प्रमाणावर होवू लागला आहे. सुलभ, सहज व सोपी भाषा यामुळे समज आकलन व उपयोग मोठया प्रमाणावर होत आहे. या सर्वांसाठी वेगवेगळया व्यवस्थाही निर्माण झालेल्या आहेत. आणि या सर्व बदलांचा परिणाम म्हणून उपयोजित साहित्य निर्मिती होवू लागली. भाषेचे नवीन तंत्र आणि नवी भाषा उदयास येवू लागली आहे. सामाजिक आचार-विचार, आरोग्य शिक्षण, राहणीमान, फॅशन, दळणवळण, सौंदर्य, ज्ञान, विज्ञान-तंत्रज्ञान, प्रसारमाध्यमे, वाणिज्य-व्यापार, राजकारण, प्रशासन, शिक्षण धर्म-संस्कृती, कला, तत्त्वज्ञान, अध्यात्म, कृषी, सामान्यज्ञान, स्पर्धापरिक्षा या मानवी जीवन व्यवहाराला अनुसरुन उपयोजित साहित्याची निर्मिती मोठया प्रमाणावर झालेली आहे. अशा सर्व प्रकारच्या साहित्याने मानवी जीवन व्यवहार सुलभ होण्यासाठी हातभारच लावला आहे. मराठी वाङ्मयातील अशी विस्तृत निर्मिती असणाऱ्या साहित्याच्या व भाषेचा अभ्यास होणे गरजेचे आहे. येथे फॅशन संबंधाच्या माहितीपर साहित्याचा विचार आपण करणार आहोत.

**फॅशनसंबंधी साहित्य :**

मानवाच्या व्यक्तिमत्त्वातील सर्वात महत्त्वाचा घटक म्हणजे दिसणे आणि असणे हा होय. आपण कसे दिसतो व कसे व्यक्त होतो याला महत्त्व असते. माणसाच्या आरोग्याबरोबरच समाजातील होणाऱ्या व्यवहारात आपले सादरीकरण

हे सुध्दा चांगले व्हावे असे वाटते. त्यामुळे वेशभूषा, मेकअप (शृंगार), हेअरस्टाईल (केशरचना) अंगावरील दागिने इत्यादींच्या माध्यमातून चांगला प्रभाव पाडता येतो. भारतीय संस्कृतीमध्ये तर दर महिन्याला कुठला ना कुठला उत्सव व सण, व्रत असते. यासाठी चांगल्या पध्दतीने सादर व्हावे लागते. विशेषत: महिलावर्ग या सण-उत्सवाच्या काळामध्ये आपल्या संस्कृती बरोबरच नाविन्याचे दर्शन घडविण्याचा प्रयत्न करीत असतात. त्यामुळे फॅशन डिझायनिंग, ज्वेलरी डिझायनिंग, हेअर स्टायलिस्ट, मेकअप अशा क्षेत्रांचा विस्तार मोठया प्रमाणावर झाला आहे. त्यामुळे बाजारामध्ये अशा सर्व वेशभूषा, केशभूषा, सौंदर्य प्रसाधने, ज्वेलरी या संबंधीची पुस्तके उपलब्ध असतील तर ती पुस्तके मिळवून त्यातील माहितीच्या आधारे वशेभूषा, केशभूषा, मेकअप, सौंदर्य साधने यांचा वापर समाजाकडून होतो आहे. त्यामुळे या प्रकारचे माहितीपर साहित्य ज्याला उपयोजित साहित्य म्हणता येईल ते मोठया प्रमाणावर उपलब्ध झाले आहे. मागणी तसा पुरवठा या न्यायाने प्रकाशकांनी अशा माहितीपर साहित्याची निर्मिती केलेली दिसते.

जीवनशैली म्हणजे माणसाची जगण्याची एक प्रकारची पध्दती होय व फॅशन म्हणजे लोकप्रिय व आत्यंतिक समकालीन शैली होय. कपडे घालणे, वापरणे, शिवणे यासंबंधीच्या अनेक फॅशन आपल्याला काळानुसार बदलणाऱ्या दिसतात. परंतु फॅशन म्हणजे नाविन्य होय. या नाविन्याचा शोध घेण्याचा प्रयत्नच मुळात नव्या पिढीकडून होताना दिसून येत आहे. काळानुसार मानवी जीवनशैलीमध्ये अनेक प्रकारच्या फॅशन येतात. आणि त्या काळाच्या ओघात मागेही पडतात. परंतु काही फॅशन अशा असतात की त्या दिर्घकाळ टिकून राहतात. फॅशनेबल राहण्याच्या, सुंदर दिसण्याच्या काही साचेबंद कल्पना प्रचलित आहेत. परंतु अशा ठोकळेबाज संकल्पनांना छेद देवून अगदी कोणीही आपलीशी करु शकेल अशी फॅशन सध्या समाजामध्ये रुढ झालेली दिसते. 'कम्फर्टेबल' आणि 'इकोफ्रेंडली' हे दोन शब्द आजच्या फॅशन व्यवहारामध्ये महत्त्वपूर्ण मानली जाताना दिसतात. लिंगभेद, वर्णभेद या गोष्टीही फॅशनमधून मोडीत निघालेल्या आहेत.

फॅशनेबल कपडे घालणे, वापरणे, शिवणे, वेशभूषा-केशभूषा, मेकअप, पावडरी, स्प्रे याबाबतीत लोकप्रिय आणि आत्यंतिक समकालीन शैली, सजावट, वर्तनव्यवहार यासंबंधी आकर्षण निर्माण होईल अशा प्रकारचे हे लेखन असते. त्याचबरोबर ज्यांना अशा प्रकारच्या व्यवसायामध्ये पडायचे असेल अशा सर्वांसाठी असे लेखन केले जाते. तरुण पिढी नेहमीच नवीन काहितरी हवे आहे, जरा 'हटके लूक' हवा असे म्हणताना दिसते. त्याच, त्याच गोष्टी वापरुन त्यांना कंटाळा आलेला असतो. म्हणून ग्राहकांसाठी नवीन काहितरी रुजविण्यासाठी या प्रकारचे लेखन होताना दिसते. तयार कपडयांच्या बाजारात आपला ब्रॅन्ड टिकून राहवा व आपले वर्चस्व प्रस्थापित व्हावे आणि असे वर्चस्व गाजविण्याच्या प्रयत्नात अनेक कंपन्या असतात. अशा कंपन्यांकडूनही या प्रकारच्या लेखनाचा घाट घातला जात असतो.

संगणक, स्मार्टफोन, इंटरनेट यांच्या प्रसारामुळे व वापरामुळे जागतिक पातळीवर जीवनशैलीचा संपर्क वाढला. यातून फॅशनच्या विश्वात एक वेगळा आयाम निर्माण झाला. जग ही एक मोठी बाजारपेठ बनली आहे. कुठल्याही देशातील कपडे, सौंदर्य प्रसाधने कुठेही मिळू लागली. (Imported) 'इम्पोर्टेड' वस्तूंना महत्त्व प्राप्त झाले. सुखवस्तूपणाची ओढ लागली. वेस्टर्न आऊटफिटला सहजपणे आपलसं केले जावू लागले. पश्चिमेकडील संस्कृती, कलर फोरकास्ट किंवा ट्रेड फोरकाष्ट वेस्टर्न स्टायलिस्टकडून उदयाला आली. अशा 'इंडस्ट्री'चे मार्केटींग (marketing) करण्यासाठी या प्रकारचे लेखन मराठी साहित्यामध्ये ज्याला माहितीपर साहित्य म्हणता येईल त्यातून केले जावू लागले.

बदलत्या काळानुसार प्रसारमाध्यमांमध्ये मोठया प्रमाणावर बदल घडून आले. दृश्य माध्यमे फॅशनच्या प्रसाराला पुरक ठरली. सौंदर्यस्पर्धा, चित्रपट पुरस्कार सोहळे यांचे जागतिक पातळीवर व भारतीय, स्थानिक पातळीवर थेट प्रक्षेपण होवू लागते. यातून आकर्षकपणा, चकचकीतपणा वेगवेगळया फॅशन्स यांचे दर्शन प्रेक्षकांना होवू लागले. असे पुरस्कार सोहळे हे नामवंत कंपन्या आपला ब्रँड रुजविण्यासाठी स्पॉन्सर करु लागल्या. याचा परिणाम ग्राहकांची मानसिकता तयार करण्यासाठी होवू लागला. प्रसिध्द ब्रँन्डला बाजारपेठ उपलब्ध करण्यासाठी या प्रकारचे पुरस्कार सोहळे घडवून आणले

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) - 3.009, (GIF) -0.676 (2013)
Special Issue 47 : Indian Literature & Society
UGC Approved No. 40705 & 44117
ISSN : 2348-7143
February 2018

जावू लागले आहेत. अनेक वाहिन्या मनोरंजनाबरोबरच असे फॅशन वीक, पुरस्कार सोहळे यांचे थेट प्रसारण करु लागल्या आहेत. पुन्हा-पुन्हा, तेच-तेच दाखवून ग्राहकवर्ग निर्माण करण्यासाठी प्रसारमाध्यमातून मोठ-मोठया कंपन्या प्रयत्न करताना दिसतात. याचा परिणाम फॅशन रुजविणे, मार्केटिंग करणे, ग्राहकांची मानसिकता तयार करणे यासाठी होवू लागला. तसेच ब्रँन्ड विकसीत करणे, प्रचार-प्रसार करणे यासाठी वर्तमानपत्रातूनही विशेष अशा पुरवण्यांमधून असे लेखन होवू लागले आहे.

आकर्षक मांडणी, रंगीत चित्रे सहजपणे वाचकांचे लक्ष वेधून घेतात. रंजक माहिती यामधून दिली जाते. 'फॅशन' ही फक्त कपडयांच्या संदर्भातच नाही, तर केस रचनेपासून तर पायातील चप्पल-बूट पर्यंत या सगळयाच गोष्टी फॅशनमध्ये येतात. त्यातील रंगसंगती, आवश्यक ॲक्सेसरीज यांचाही समावेश होतो. इतकेच नाहीं तर फॅशन या संकल्पनेची व्याप्ती घरातील अंतर्गत सजावट, रोजच्या जीवनातील वापरात येणाऱ्या लहान-मोठया गोष्टी अशी अमर्याद आहे. यासाठी रोजच्या वापरातील सोपे प्रचलीत असे हिंदी-इंग्रजी शब्दांचा वापर अशा लेखनामध्ये होताना दिसतो. उदा. Trend, Craze, Mania Style अशा अनेक प्रकारच्या शब्दांची सरमिसळ होत असते.

सुंदर चेहऱ्याचा वापर, चित्रे, आकर्षकपणा या सर्वच गोष्टींचा वापर या प्रकारच्या लेखनातून केला जाता. चित्राकर्षकपणा यातून वाचकांचे लक्ष वेधून घेतले जाते. चित्रांच्या माध्यमातून आकर्षक सजावट, छान डिझाईन, नक्षी यांचा वापर करुन या प्रकारचे लेखन केले जाते. रंगसंगतीतून वाचकांचे लक्ष सहजपणे वेधून घेतले जाते. म्हणूनच अशा लेखनातून आकर्षकपणा, सुबक मांडणी, आखीव, रेखीव चित्रशैली, रंगरेषा यातून एक विशिष्ट आकार धारण करणे, रुजवणे, मांडणे, जास्तीतजास्त अद्यावत दिसणे, लाट निर्माण करणे, अशा साहित्याचे स्वरुप हे माहितीपर असते. तंत्राला, माहितीला चित्रे, आकृत्या, रंगरेषा यांनी बळ दिलेले असते.

RESEARCH JOURNEY